**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**
पोस्ट–शिर्डी–४२३१०९, तालुका राहाता, जिल्हा अहमदनगर.
फोन नं. ०२४२३-२५८५००, फॅक्स नं. ०२४२३-२५८८७०
Website:-www.sai.org.in

# सिलबंद दरपत्रक मागणी सूचना

नवीन दर्शनरांगेत बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमे-यांची संख्या २०६ नग व ०३ NVR सहीत इतर अनुषंगीक साहित्य बसविण्यात आलेले आहेत. या यंत्रणेचे दुरुस्ती देखभालीचे कामेAMC द्वारे करुन घेणेकामीइच्छुक दरपत्रकधारकांकडून खाली नमूद केलेल्या अटी-शर्तीनुसार सिलबंद दरपत्रके मागविणेत येत आहेत .

**तपशील खालीलप्रमाणे –**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | रक्कम(विना टॅक्स) |
|---|---|---|---|
| 1. | नवीन दर्शन रांगेतील सीसीटीव्ही कॅमे-यांचे मॅन्टेनन्स स्थळपरीक्षण, दुरुस्ती-देखभाल व साफसफाई सह. २०६ IP Camera सह. (Switch, NVR, Cable,) व इतर अनुषंगीक साहित्याचे ०२ वर्षाचा वार्षिक देखभाल करार )AMC) अभियंत्यासोबत महिन्यातून दोनदा अनिवार्य राहील व जेव्हा आवश्यक असेल तेव्हा भेट देणे बंधनकारक असेल. | | |
| एकुण रक्कम - | | | |

**अ)सोबत आवश्यक कागदपत्रे**

१) पॅन कार्ड आणि जीएसटी नोंदणीची छायांकित प्रत.
२) इच्छुकनिविदाधारक अधिकृत विक्रेता/भागीदार/सेवा केंद्र नोंदणीआवश्यक आहे,
३) AMC चे दरावर लागणारे वेळोवेळीचे शासकीय कर त्या त्या वेळेच्या दरानुसार लागु राहतील.

**ब) कामाची व्याप्ती**

१) वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार (AMC) हा संपूर्णपणे ऑन-साइट दुरुस्ती देखभाल करार असेल.
२) कोणताही स्पेअरपार्ट नादुरुस्त/खराब किंवा तो बदलवयाचा असल्यास त्यांचा तांत्रिक तपशील व त्याचे अंदाजे बाजार मुल्यांकन देणे हे बंधन कारक असेल व साईबाबा संस्थान त्यांचे नियमाप्रमाणे सदरील स्पेअरपार्टची खरेदी करुन निविदा धारकास देण्यात येईल सदरील स्पेअरपार्ट बसवविण्याची जबाबदारी इच्छुक निविदाधारकाची असेल.
३) संबंधीत अभियंता/टेक्नेशीयन हा पुर्ण वेळ साईबाबा संस्थानचे नवीन दर्शनरांग येथे उपलब्ध ठेवावा लागेल तसेच कामाच्या सोई-नुसार अभियंता/टेक्नेशीयन यांना कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त हजर राहवे लागेल.
४) कंत्राटदारानेसीसीटीव्हीची देखभाल/दुरुस्तीसाठी कॉल केल्यानंतर 24x7 सुनिश्चित राहील.कॉल केल्यास त्याबाबचे कामाचा तपशील नोंद रजिस्टरला नोंद ठेवणे व विभागाच्या कार्यालयात ठेवणे गरजेचे असेल.
५) सीसीटीव्हीचे सर्व साहित्य वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार (AMC) कार्यादेश स्विकारले पासुन दोन वर्षाच्या कालावधीसाठी वैध राहील.
६) सर्वसमावेशक ०२ वर्षाचा देखभाल व दुरुस्ती करार (AMC) अभियंत्याला महिन्यातुन दोनदा भेट द्यावी लागेल तसेच गरजेनुसार आवश्यकता असल्यास कॉल करुन बोलविण्यात येईल तेव्हा अभियंत्याला येणे बंधनकारक राहील.

**क)कामाचे स्वरुप –**

१) सर्व सीसीटीव्ही यंत्रणा व्यवस्थित चालु असले बाबत दैनंदिन शहानिशा करणे.
२) Cable,Network, Rack,Optic Fiber Cable यांच्या संरचना(diagram) अवगत करुन घेणे तसेच वेळोवळी स्वीच व केबल खराब झाल्यास त्यांची व्यवस्था करणे व केबल खराब / कट झाल्यास त्या जागी नवीन केबल टाकणे अथवा जोडणे इतर सर्व कामे करावी
३)उत्पादीत कंपन्यांनी सीसीटीव्ही साठी अद्यावत ऑपरेटींग सिस्टींम उपलब्ध करुन दिले असेल तर ते अपडेट करुन देणे त्यासाठी इंटरनेट आवश्यक असल्यास ते संस्थान मार्फत देण्यात येईल.
४) सीसीटीव्ही कॅमेरे व इतर यंत्रणा बंद झाल्यास ते चालु करण्याची व्यवस्था करणे.
५) दुरुस्ती/देखभालीसाठी लागणारे सर्व Tools / Equipment संबंधीत इच्छुक निविदाधारकांनी स्वतः उपलब्ध ठेवणे.
६) पुरवठा धारकांनी नियुक्त केलेले अभियंता/टेक्निशीयन यांना सुरक्षीतेचे सर्व नियम पाळणे बंधन कारक असेल. त्याची सर्व जबाबदारी संबंधीत पुरवठाधारकाची राहील (वित्त, जीवतहानी,कार्यालयीन नियम,कर्मचा-यांशी सुसंवाद व्यवस्थित ठेवणे. ) संबंधीत टेक्निशीयनचे पोलिस व्हेरीफिकेशन देणे बंधनकारक राहील. हि सर्व जबाबदारी इच्छुक निविदाधारकांची राहिल.
७) दैनंदिन हजेरी मस्टर ठेवणे इच्छुकनिविदाधारकास बंधन कारक राहिल.

**ड) अटी आणि नियम.**

१) AMC चे दरावर लागणारे वेळोवळीचे शासकीय कर त्या त्या दरानुसार लागु राहतील.

२) उत्सवाचे व गर्दीच्या काळात आवश्यकतेनुसार व गरजेनुसार जादा वेळ थांबणे बंधनकारक राहील.

३) AMC चे बिल हे त्रैमासिक अदा केले जातील परंतु त्रैमासिक बिल अदा करतांना अभियंता/टेक्नेशीयन यांचेहजेरी रजिस्टर झेरॉक्स/ रजिस्टर सादर करणे बंधन कारक असेल.

४) कामाच्या ठिकाणी संबंधीत अभियंता/टेक्नेशीयन यांचे कडुन काही अनुचित प्रकार / अपघात घडल्यास सर्वस्वी जबाबदारीसंबंधीत इच्छुक निविदाधारकांची असेल.

५) AMC कालावधीत संस्थांनचे कोणतीही वस्तु अभियंता/टेक्निशीयन यांचे चुकीमुळे/निष्काळजीपणामुळे खराब झाल्यास किंवा गहाळ झाल्याससंबंधीत इच्छुकनिविदाधारकांकडुन वसुल केले जाईल.

६) सीसीटीव्ही बाबत तक्रार असल्यास 24 तासांच्या आत त्याचे निवाराण करणे अनिवार्य राहिल अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

७) नादुरुस्त व खराब झालेले स्पेअर पार्ट व सुटे साहित्य संस्थान प्रतिनिधीकडे सुपूर्द केले जावे आणि त्याची तक्रार निवारण रजिस्टरला नोंद करावी.

८) सीसीटीव्हीची देखभाल /दुरुस्तीची संपूर्ण कामकाजाच्या सुस्थितीत ठेवणे ही इच्छुक निविदाधारकांची मुख्य जबाबदारी असेल.

९)कोणतेही अगर सर्व दरपत्रक स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थांन प्रशासनाने राखुन ठेवला आहे.

१०)आपलेदरपत्रक उपरोक्तप्रमाणे स्वताःचे फर्मचेलेटरहेडवर मोहोर बंद पाकीटात पाठविणे. तसेच दि.२३|०९|२४पर्यंत वरील अटी/शर्तीत अधीन राहुन तातडीने पाठविण्याचे करावे. त्यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

११) निविदा व निविदा प्रक्रियेचे सर्व हक्क संस्थांन प्रशासनाने राखुन ठेवलेले आहेत.

**इ) दरपत्रकसादरकरणे :-**

**सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग दरपत्रक - नवीन दर्शन लाईन CCTV यंत्रणा देखभाल/दुरुस्ती AMC-**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**
**मु.पो.-शिर्डी. ता. राहाता.**
**जिल्हा - अहमदनगर**
**पिनकोड-423109**

मसुदा मान्यतेसाठी.

Signed by
Goraksha Mahadeo Gadilkar
Date: 02-09-2024 20:53:35

(गोरक्ष गाडीलकर) भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.